# मुलांसाठी बाइबल
प्रस्तुत



# दाविद राजा
(भाग २)

लेखक: Edward Hughes
रेखाचित्रकार: Lazarus
रूपान्तरकार: Ruth Klassen
अनुवादक: Rev. Shilas Gavit
निर्माता: Bible for Children
www.M1914.org

BFC
PO Box 3
Winnipeg, MB R3C 2G1
Canada

©2015 Bible for Children, Inc.
परवाना (लाइसेंस): तुम्ही जोपर्यंत ही गोष्ट विकत नाहीत,
तोपर्यंत तुम्ही ती कॉपी किंवा मुद्रित करू शकता.

दक्षिण इस्त्राएलात दाविद यहुदाचा
राजा होता. परंतू इस्त्राएलातील
इतरांनी शौलाचा मुलगा
ईश-बोशेथ याला घेऊन
राजा घोषित केले. सात
वर्षे पर्यंत यादवी
युध्द् सुरु होते.
परंतू दाविद
अधिकाधिक
मजबूत
होत गेला.



अखेरिस ईश–बोशेथ त्याच्या स्वतःच्या दोन सैनिकांकडून मारला गेला.



मग सर्व इस्त्राएलाचे सर्व वंश दाविदाकडे आले व त्यांनी दाविदाचा राज्याभिषेक केला. दाविदाच्या संपूर्ण हयातीत दाविद इस्त्राएल देशाचा राजा राहिला.



दाविदाने सर्वप्रथम यरुशलेम जिंकून ताब्यात घेतले. दाविदाचे शहर अशी त्या शहराची ओळख निर्माण झाली. शत्रूंच्या विरुध्द् मजबूत शहर अशी त्या शहराची त्याने पुनर्उभारणी केली. पलिष्टी आणि इस्त्राएलाच्या अन्य शत्रूंवर विजय मिळविण्यासाठी दाविदाचे सैन्य यरुशलेमेतून बाहेर पडत असे.





नंतर, दाविद राजाने
कराराचा कोश यरुशलेमेत
आणला. कराराच्या
कोशात दहा आज्ञा व
मोशेला दिलेल्या इतर
आज्ञा होत्या. परमेश्वराच्या
पवित्रतेची आणि
इस्राएलांनी परमेश्वराचे
आज्ञा पालन करावे याचे
स्मरण करुन देणारा हा
कराराचा कोश होता.



दाविद, राजा बनल्या नंतर त्याच्या सुरवातीच्या दिवसात त्याला पुष्कळ युध्दे करावी लागली. जो जो परमेश्वराच्या मार्गदर्शनासाठी प्रार्थना करीत असे असा तो हुशार योध्दा आणि नम्र मनुष्य होता.



दाविद स्वतः चांगल्या घरात राहात
होता आणि देवाच्या कराराचा
कोश मात्र तंबूत राहात असे हि
गोष्ट दाविदाला खात होती.
दाविदाने मंदिर बांधण्याचा निर्णय
घेतला. देवाचा संदेष्टा नाथान,
याने मंदिर बांधण्याच्या
कामी पुढे सरसावण्यास
सांगितले.



त्या रात्री, परमेश्वराने
दाविदासाठी एक संदेश पाठविला :
"माझ्या सेवका दाविदा, परमेश्वर तुला म्हणत आहे की मी तुझे घराणे कायमचे स्थापीन. तुझे दिवस पुरे झाले आणि तूं जाऊन आपल्या पितरांबरोबर निजलास म्हणजे, मी तुझ्या मुलाला तुझ्यामागून राजा करीन. तो माझ्या नामाप्रीत्यर्थ मंदिर बांधील आणि मी त्याचे राजासन कायमचे स्थापीन."

शौलाच्या कुटूंबातून कोणी बचावले असेल तर शौल त्याला मदत करु इच्छित होता. त्याला केवळ योनाथानाचा मुलगा मफीबोशेथ, जो पांगळा होता तो आढळला. "राजाच्या एखाद्या पुत्रा प्रमाणे तो माझ्या पंक्तिस बसून जेवण करील" असे दाविद म्हणाला. योनाथान दाविदाचा उत्तम मित्र असल्यामुळे दाविद मफिबोशेथबरोबर दयाळूपणे वागला.



दाविदाने परमेश्वरावर जितका अधिक भरोसा केला व जितके अधिक आज्ञापालन केले, परमेश्वराने दाविदाची तितकी अधिक भरभराट केली. परंतू एके दिवशी एक भयंकर सावली दाविदाच्या जीवनावर पडली. त्याने त्याच्या सैन्याला युध्द् करण्यास बाहेर पाठविले आणि तो स्वतः यरुशलेमेत राहिला. एके रात्री, त्याला झोप लागत नव्हती. म्हणून तो धाब्यावर गेला आणि शहराकडे नजर फिरवली.



एक सुंदर स्त्री आंघोळ करतांना दाविदाने पाहिली. तिचे नाव बथशेबा असे होते. तिचा पती उरिया हा दाविदाचा एक शुर सैनिक असतांना देखिल दाविदाने तिच्याशी पाप केले. काहि दिवसांनी जेंव्हा बथशेबाने दाविदाला कळविले की तिला त्याच्याकडून दिवस गेले आहे, तेंव्हा दाविदाला कळले की त्याचे पाप अधिकच समस्या निर्माण करित आहे.







त्याचे पाप देवाकडे कबूल करण्याऐवजी दाविद ते झाकण्याचा प्रयत्न करु लागला. पण असे कधि होत नाही ! त्याने उरियाला युध्द्ावरुन घरि बोलाविले, जेणेकरुन ते मुल त्याचे आहे असे त्याला वाटेल अशी दाविदाची अपेक्षा होती. परंतू त्याचे सह-सैनिक युध्द्ावर असतांना उरिया त्याच्या बायको जवळ जाण्यास तयार नव्हता. त्या रात्री उरिया राजाच्या घराच्या दारातच झोपला.

म्हणून दाविदाने पहिल्यापेक्षा
अधिक दुष्ट कृति केली.
उरियाच्या हाती एक पत्र
देऊन त्याला परत युध्द्
भूमिवर पाठविले. ते पत्र
युध्द् प्रमुखास लिहिलेले
होते. युध्द्‌ात उरिया मारला
जाईल याची काळजी घ्या
असे त्या पत्रात लिहिले होते.
जेंव्हा उरिया युध्द्‌ात मारला
गेला तेंव्हा दाविदाने
बथशेबाला त्याची पत्नी
करुन घेतली.





दाविदाला त्याचे पाप दाखविण्यासाठी परमेश्वराने नाथान नावाच्या संदेष्ट्याला दाविदाकडे पाठविले. नाथानाने दाविदाला एका फारच श्रीमंत आणि एका फारच गरिब मनुष्याची गोष्ट सांगितली. श्रीमंत मनुष्याजवळ शेकडो मेंढरे होती, परंतु या गरिबाकडे केवळ एकच लहान मेंढरु होते, त्याला त्याने स्वतःच्या मुलिप्रमाणे सांभाळले होते.

एकदा त्या श्रीमंताकडे एक पाहुणा आला, तेंव्हा पाहुण्यासाठी भोजन तयार करावे म्हणून त्याने त्याच्या मेंढरांपैकी एखादे न घेता, त्या गरिब मनुष्याची ती मेंढी घेऊन त्याने ती कापली.



श्रीमंत मनुष्याच्या स्वार्थीपणावर
दाविदाचा राग भडकला. "ज्या मनुष्याने
हे काम केले तो प्राणदंडास पात्र आहे."
असे तो मोठ्याने ओरडून म्हणाला.



धिटाईने नाथान दाविदास म्हणाला, "तो मनुष्य तूंच आहेस." दाविदाने जे केले होते ते या गोष्टीतील श्रीमंत मनुष्याने केले त्याच्यापेक्षा अधिक भयानक होते.





तो किती दुष्ट होता हे परमेश्वराने दाविदाला दाखवून दिले. आणि दाविदाने केलेल्या पापाविषयी दाविदाला वाईट वाटले. तो परमेश्वराला म्हणाला, "मी तुझ्याविरुध्द् पातक करुन हे कृत्य केले आहे." आणि परमेश्वराने दाविदाच्या पापाची क्षमा केली. परंतू बथशेबाला झालेले मुल फारच आजारी पडून मरण पावले.



दाविदाने केलेल्या भयंकर पापाची परमेश्वराने क्षमा केली. त्यानंतर बथशेबापासून दाविदाला दुसरा मुलगा झाला, त्याचे नाव शलमोन असे होतो, तो दाविदानंतर एक महान राजा बनणार होता. परंतू दाविद राजाला अजून इतर देखिल लेकरे होते, काही लेकरांनी दाविदाच्या जीवनात दुःख आणले.

दाविद राजा (भाग २)

परमेश्वराची वाणी – बाइबल मधून गोष्ट

घेण्यात आली आहे

२ शमुवेल १–१२

"तुझ्या वचनांच्या उलगड्याने प्रकाश प्राप्त होतो."
स्तोत्रसंहिता ११९:१३०

# समाप्त

बाइबलमधील ही गोष्ट आम्हांला आमच्या सुंदर परमेश्वराविषयी सांगते ज्याने आम्हांला बनविले आणि ज्याची अशी इच्छा आहे की आम्ही त्याला ओळखावे.

परमेश्वराला माहित आहे की आम्ही वाईट गोष्टी केल्या आहेत, ज्याला तो पाप म्हणतो. पापाची शिक्षा मरण आहे, पण परमेश्वर तुमच्यावर इतके प्रेम करतो की त्याला तुमच्या पापांची शिक्षा मिळावी आणि वधस्तंभावर मरावे म्हणून त्याच्या एकुलता एक पुत्र येशू याला पाठविले. नंतर येशू जिवंत झाला आणि स्वर्गातील घरी गेला. जर तुम्ही येशूमध्ये विश्वास ठेवता आणि तुमच्या पापांसाठी त्याने क्षमा करावी अशी त्याला विनंती करता, तर तो नक्की क्षमा करील. तो आता तुमच्याबरोबर येऊन राहील आणि तुम्ही त्याच्याबरोबर कायम राहणार.

हे सत्य आहे यावर जर तुम्ही विश्वास ठेवता, तर परमेश्वराला हे सांगा:
प्रिय येशू, तू परमेश्वर आहेस आणि माझ्या पापांसाठी मरण पावण्यास मनुष्य बनला आणि आता तू जिवंत आहे यावर माझा विश्वास आहे. कृपा करून माझ्या जीवनात ये आणि माझ्या पापांची मला क्षमा कर, जेणेकरून आता मला नवीन जीवन प्राप्त होईल, आणि एके दिवस मी कायम तुझ्याबरोबर राहण्यासाठी येईन. तुझी आज्ञा पाळण्यासाठी आणि तुझे मूल होऊन जगण्यासाठी मला मदत कर. आमेन.

बाइबल वाचा आणि परमेश्वराशी रोज बोला! योहान 3:16